महाराष्ट्र शासन

**तात्काळ /कालमर्यादा /ई-मेल** क्रमांक : एसएलएस-२०२१/(प्र.क्र. ३४/२०२१)/आ(वर्ग-२),

E-Mail : doesttclass२.wrd@maharashtra.gov.in जलसंपदा विभाग,
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९४१४५ हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : १५/०७/२०२१

प्रति,

जलसंपदा विभागातील सर्व महासंचालक
सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळे, जलसंपदा विभाग
आयुक्त, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद
जलसंपदा विभागातील सर्व मुख्य अभियंता
अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे
अधीक्षक अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक
अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, ठाणे / पुणे / औरंगाबाद / नागपूर / अमरावती
अधीक्षक अभियंता, कृष्णा पाणी तंटा लवाद, विशेष कक्ष, पुणे.

**विषय :- दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांच्या पदोन्नतीबाबत.**

शासनाची समक्रमांक, दिनांक ०६.०७.२०२१ व दिनांक १४.०७.२०२१ ची पत्रे या पत्रान्वये रद्द करण्यात येत आहेत.

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक- दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६-अ, दिनांक ०५.०७.२००१ अन्वये राज्य शासनातील दिव्यांग अधिकारी/कर्मचाऱ्यांना गट अ व गट ब मधील पदांवर पदोन्नतीमध्ये ४% आरक्षण विहित करण्यात आले आहे.

३. जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक-दिव्यांग २०१९/प्र.क्र.९९/आ(संनि), दिनांक १८.०२.२०२१ अन्वये जलंसपदा विभागातील गट-अ व गट-ब संवर्गातील पदे दिव्यांगासाठी सुनिश्चित करण्यात आली आहेत. त्याअनुषंगाने उप अभियंता (विवयां) हे पद पुढील दिव्यांग प्रवर्गासाठी सुनिश्चित करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | पदनाम | शारिरिक पात्रता | दिव्यांग प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | उप विभागीय अभियंता (स्थापत्य) | S,ST,W,BN,JU, CL,MF, RW,SE,C | a) D,HH<br>b) OL,CP,LC,Dw,AAV<br>c) ASD (M),SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) above |

४. सहायक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) संवर्गाची शासन परिपत्रक, क्रमांक : ज्येष्ठता २०१७/(प्र.क्र. ९६/२०१७)/आ (स.अ.श्रे-२), दिनांक ०१.०९.२०१७ अन्वये प्रसिध्द केलेल्या ज्येष्ठतासुचीतील ज्येष्ठता क्र. १५६० पासून पुढील अभियंत्यांची यादी विचारात घेण्यात आली आहे. तरी ज्येष्ठता क्र. १५६० पासुन उप विभागीय अभियंता (स्थापत्य) संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नतीसाठीची

अर्हताकारी सेवा (३ वर्षे) पूर्ण करणाऱ्या दिव्यांग अभियंत्यांची पदोन्नतीच्या अनुषंगाने माहिती सोबतच्या विवरणपत्रामध्ये नमूद रकान्याप्रमाणे MS-Excel या फॉंटमध्ये माहिती टंकलिखित करून Soft Copy व Hard Copy सह शासनास तात्काळ दिनांक १६.०७.२०२१ पर्यंत उपलब्ध करून देण्यात यावी.

आपल्या अधिनस्त कार्यरत एखाद्या दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांची माहिती उपलब्ध न झाल्यामुळे प्रदेश कार्यालयांतर्गत/मंडळ कार्यालयांतर्गत कार्यरत दिव्यांग अभियंते पदोन्नतीपासून वंचित राहिल्यास किंवा भविष्यात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता यांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

सदर शासन पत्र हे महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभागाच्या wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यावरुन या पत्राची प्रत संबंधितांनी काढून घ्यावी व माहिती विहित विवरणपत्रात दिलेल्या वेळेत सादर करावी.

(रणजित शि. अहिरे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

**सोबत**- १. विवरणपत्र
२. सा.प्र.वि. चे पत्र, दिनांक १४.०७.२०२१

प्रत :- आस्था (वर्ग-२) कार्यासन संग्रहार्थ.

विवरणपत्र -अ

शासन क्रमांक : एसएलएस-२०२१/प्र.क्र. ३४/२०२१/आ(वर्ग-२) दि. १५/०७/२०२१

उपविभागीय अभियंता (स्थापत्य) पदावर दिव्यांग प्रवर्गातुन पदोन्नती विचारक्षेत्रात असलेल्या सहायक अभियंता श्रेणी-२ (स्था) यांचा सेवातपशील

| अ. क्र. | जेष्ठता क्र | अधिका-याचे नांव (मराठीत संपूर्ण नाव द्यावे-आद्याक्षरे देऊ नयेत.) | जन्मदिनांक (दिनांक DD-MM-YY या नमुन्यात द्यावा-) | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक पात्रता | कनिष्ठ पदावरील नियुक्तीचा दिनांक | मूळ जात प्रवर्ग (जात/पोटजात नमूद करावी)/ | नियुक्तीचा जात प्रवर्ग | जात प्रमाणपत्राची वैधता झाली आहे किंवा कसे | महाराष्ट्रातील मूळ निवासी आहेत किंवा कसे? | व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण आहेत काय, असल्यास दिनांक | मराठी/हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण आहेत काय असल्यास दिनांक | संगणक परीक्षा उत्तीर्ण आहेत काय, असल्यास दिनांक | विभागीय चौकशी चालू/प्रस्तावित आहे किंवा कसे? असल्यास दोषारोप पत्राची प्रत उपलब्ध करून द्यावी. | स्थायित्व प्रमाणपत्र | सदर अधिका-याचे ५०/५५ वर्षाचे पुनर्विलोकन झाले आहे काय? | सन २०१५-१६ ते २०१९-२० या कालावधीच्या गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेरे कळविण्यात आलेले आहेत काय, असल्यास त्याची प्रत द्यावी | दिव्यांगत्वाचा प्रकार (अ/ब/क/ड/इ) ** | दिव्यांग प्रमाणपत्र देणारे प्राधिकारी, व प्रमाणपत्राचा दिनांक, सोबत सांक्षांकित प्रमाणपत्र सादर करण्यात यावे | दिव्यांगत्व शासन सेवेत प्रवेशघेण्यापूर्वी आले आहे अथवा सेवाप्रवेशोत्तर? | अधिकारी स्वत: विधवा/परितक्त्या असल्यास त्याबाबतचा पुरावा/अधिकारी किंवा त्यांचे मूल मतिमंद असल्यास त्याबाबतचा पुरावा सादर करावा | सदर अभियंत्याने दिनांक ३१ मार्च २०२० अखेरचे मत्ता व दायित्व प्रमाणपत्र सादर केले आहे किंवा कसे ? | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ |
| १ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

**दिव्यांगत्वाचा प्रकार निश्चित करतेवेळी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६-अ, दिनांक ०५.०७.२०२१ मधील तरतुदी गृहित धरण्यात याव्यात.

<u>महत्त्वाची टिप</u> :-

(१) सन २०१५-१६ ते २०१९-२० या कालावधीतील मूळ गोपनीय अहवाल पाठवावेत. मूळ गोपनीय अहवाल उपलब्ध नसतील तर दुय्यम गोपनीय अहवाल पाठवावेत. अर्धवट गोपनीय अहवाल पाठवू नयेत. मागणी केलेल्या वर्षाव्यतिरिक्त जादा गोपनीय अहवाल पाठवू नयेत. प्रत्येक गोपनीय अहवालाच्या मुखपृष्ठावर संबंधित कार्यालयाचे नाव व ज्येष्ठता क्रमांक नमुद करावा.

(२) मागास प्रवर्गातील अधिकाऱ्यांचे मूळ जात प्रमाणपत्र व मूळ जात वैधता प्रमाणपत्राची प्रत्येकी एक जादा छायांकित प्रत प्रमाणित करुन पाठवावी. तसेच सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाची व जात वैधतेबाबतची नोंद असलेल्या पानाची छायांकित प्रत प्रमाणित करुन पाठवावी.

(३) सहायक अभियंता श्रेणी-२ संवर्गाच्या अंतिमरित्या प्रसिध्द करण्यात आलेल्या ज्येष्ठता यादीतील नोंद व कार्यालयांतर्गत कार्यरत अधिकाऱ्यांचे नांव, जात प्रवर्ग व इतर तपशिल यात काही फरक असल्यास त्याबाबतचा स्पष्ट उल्लेख माहितीमध्ये करावा.

(४) सहायक अभियंता श्रेणी-२ संवर्गाच्या अंतिमरित्या प्रसिध्द केलेल्या ज्येष्ठता यादीतील व कार्यालयांतर्गत कार्यरत अधिका-यांचे नाव, जात प्रवर्ग व इतर तपशिल यात काही फरक असल्यास त्याबाबतचा स्पष्ट उल्लेख माहितीमध्ये करावा.

| न्यायालयीन प्रकरण<br>अत्यंत तातडीचे |
|---|

<u>महाराष्ट्र शासन</u>

क्रमांक : दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६-अ
सामान्य प्रशासन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : १४ जुलै २०२१

प्रति,
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.

**विषय : दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट अ व गट ब मधील पदांवर पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत**
**संदर्भ : सा.प्र.वि., शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६ अ, दि.०५.०७.२०२१**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अनुसार दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट अ व गट ब मधील पदांवर पदोन्नती मध्ये आरक्षण विहित करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर आदेशान्वये शासन सेवेतील गट-अ व गट ब मधील पदांवर नियुक्तीस पात्र (Identified Posts) ठरविलेल्या पदांवर पदोन्नतीमध्ये ४ टक्के आरक्षण देण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार दिव्यांग प्रकारातील नमूद करण्यात आलेल्या अ, ब आणि क दिव्यांग प्रकारासाठी प्रत्येकी एक टक्के आरक्षण तसेच ड व इ या प्रकारासाठी एक टक्के याप्रमाणे एकूण ४ टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे. सदर आदेश मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अखत्यारीतील सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालय मंडळे, महामंडळे प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका , शासन अनुदानित संस्था आणि ज्यांना आदेश देण्याचा अधिकार शासनास आहे अशा सर्व संस्था व सेवा यांना हे आदेश लागू आहेत.

उक्त आदेशानुसार ज्या ज्या संवर्गातील पदे दिव्यांगासाठी सुनिश्चित करण्यात आलेले आहेत, त्या पदांवर पदोन्नती देण्यासाठी प्रशासकिय विभागांनी व त्यांच्या अखत्यारितील कार्यालयानी त्वरीत कार्यवाही करणे अपेक्षित आहे. तसेच सदरची कार्यवाही करताना मा. उच्च न्यायालयाचे दिनांक २९.०६.२०२१ व दि.०८.०७.२०२१ रोजीचे आदेश विचारात घ्यावयाचे आहेत.

..२/-

त्यामुळे रिक्त असलेल्या पदांवर पदोन्नतीसाठी जेवढया पदांची निवडसूची तयार करावयाची आहे तेवढया १०० टक्के पदांसाठी निवडसूची तयार करावी. सदर निवडसूची तयार करताना दिव्यांग आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी संदर्भाधिन शासन निर्णयात विहित करण्यात आलेल्या तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी. मात्र सद्य:स्थितीत पदोन्नती देतांना दिव्यांग नसलेल्या अधिकाऱ्यांना ५० टक्के पदांवर पदोन्नती दयावी व त्या व्यतिरिक्त दिव्यांगाकरीता पदोन्नतीसाठी लागू केलेल्या ४ टक्के आरक्षणानुसार निवडसूचीतील पात्र दिव्यांग अधिकाऱ्यांना सद्य:स्थितीतील एकूण रिक्त पदांपैकी उर्वरित ५०% रिक्त पदांवर पदोन्नती देण्यात यावी.

निवडसूचीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी जे उमेदवार जुलै, २०२१ अखेर नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत, परंतु त्या उमेदवारांना ५०% रिक्त पदांच्या मर्यादेत पदोन्नती देता येत नसल्यास अशा उमेदवारांना ५०% च्या मर्यादेतील शेवटचे उमेदवार वगळून त्या उमेदवारांना पदोन्नती देण्यात यावी.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच सदरच्या सूचना सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अखत्यारीतील कार्यालय यांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात. मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार पदोन्नतीबाबतचा अहवाल सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अखत्यारीतील कार्यालयांच्या माहितीसह एकत्रित करुन सचिव (साविस) सामान्य प्रशासन विभाग यांना **दि.२०.०७.२०२१ पूर्वी** सादर करावा.

आपला

(सीताराम कुंटे)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद/विधानसभा) विधानभवन, मुंबई
सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई- ४०० ०३२.
सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई-४०० ०३२.
मा. प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ शाखा/अपील शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
मा.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
मा. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
सरकारी वकील, उच्च न्यायालय (मूळ शाखा/अपील शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका, महाराष्ट्र राज्य.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य.
निवड नस्ती/कार्यासन १६-अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.